


संग्राहक - ह. भ. प. नंदकुमार विश्वंभर बोंगाळे, श्रीगुरू बाबासाहेब आजरेकर फडावरील वारकरी.

 - **अनुक्रमणिका**


| **विषय** | **पान पासून** | **पर्यंत** |
|---|---|---|
| नाभिक समाजाचा पूर्व इतिहास | ३ | - |
| व्यवसाय दुपारपर्यंतच करावयाचा असतो | ४ | - |
| आई, वडील, सेनांचे पूर्व युगातील जन्म, | ५ | - |
| पूर्व युगातील जन्म, रेवा संस्थानचे बांधवगड | ६ | - |
| महाराणा रामराजा, देवीदास, प्रेमकुवरबाई | ७ | - |
| रामानंदाचा सेनावर अनुग्रह | ८ | - |
| सेना महाराजांची राजसेवा व निष्काम प्रपंच | ९ | - |
| रामानंदांची माहिती, सेनांची राजसेवा | १० | - |
| सेना राजसेवा विसरले, देव हा दयानिधी आहे | ११ | १२ |
| देवानी सेनाचे रूप घेतले व राजाची सेवा करू लागले | १३ | १५ |
| ध्यानानंतर सेनाजी राजाकडे सेवेसाठी गेले | १६ | - |
| सेनामुळे राजाला दुर्लभ असलेले देवदर्शन घडले | १७ | - |
| पंढरीला देवाला व संताना भेटण्यास आले | १८ | १९ |
| सेनाजी रामानंदाशी निगडीत, पण विठ्ठलभक्ती | २० | - |
| सेनाजीनी बांधवगडला समाधी घेतली, निर्याणाचे अभंग | २१ | - |
| सेनाजींच्या निर्याण प्रसंगीची आरती | २२ | - |
| सेनाजींचे काही निवडक अभंग | २३ | २६ |
| जनाबाईने वर्णन केलेले सेनाजींचे चरित्र | २७ | - |


---

## नाभिक समाजाचा पूर्व इतिहास

नाभिक समाजाचा पूर्व इतिहास

नाभिक पुराणात नाभिकाची उत्पत्ती शंकराच्या नाभीतून झाली अशी कथा आहे. पृथ्वीवर जल प्रलय झाला. तेव्हा भगवान शंकराने तिसरा डोळा उघडला. पृथ्वीवर समुद्र, पर्वत, नद्यांची निर्मिती केली. तसेच आकाशात चंद्र, सूर्य, तारे आणि नक्षत्राची स्थापना केली. शंकराच्या कृपेने विष्णूच्या नाभीतून ब्राह्मणांची उत्पत्ती झाली. त्या ब्राह्मणाला सृष्टीची निर्मिती करण्यास सांगितले. तेव्हा विष्णूने सांगितले की ब्राह्मणाचे मौजीबंधन झाल्या शिवाय त्याला ब्राह्मणत्व येणार नाही. मौजीसाठी जानवे व शेंडीची गरज होती. शेंडीचे काम कोणी करावे असा प्रश्न निर्माण झाला. शेंडी प्राप्त होण्या साठी नाभिकाची निर्मिती आवश्यक होती. तेव्हा भगवान शंकराने आपल्या कंठातील नागाला स्वतःच्या नाभीकमलातून जन्म घेण्यास सांगितले. तेव्हा नागाने शंकराना विचारले की जन्मा नंतर कशाची प्राप्ती होईल. शंकरानी सांगितले की तुला सर्व कर्मात मोठा मान प्राप्त होईल. तुझ्या शिवाय ब्राह्मणाला ब्राह्मणत्व प्राप्त होणार नाही. तू सर्वांचा आवडता होशील. श्रावण महिन्यातील पंचमीला तुझे पूजन केले जाईल. स्त्रियांचा तू भाऊ होशील. तुझ्या वंशात उत्पन्न झालेल्या सर्वाना मान देतील. ही सर्व कथा ऐकून नागाने शंकराच्या नाभीतून मनुष्य रुपाने जन्म घेतला. शंकराच्या नाभीतून जन्म घेतल्यामुळे तो नाभिक झाला. नाभिक म्हणजे नागाचा अवतार आहे. म्हणून नाभिक बांधव नागपंचमीला आपले कर्म करत नाहीत. नाभिकमलातून जो जन्मला तो नाभिक होय.

पूर्वीच्या त्याकाळी प्रत्येक न्हाव्याच्या घरापुढे एक ओटा असे. तेथे तो न्हावी बसत असे. केस कापून घेण्यासाठी लोक तेथे जमत. थोरामोठ्यांच्या घरी न्हावी स्वतःची हत्यारे घेऊन जात असे. तेथे एका प्रशांत ठिकाणी न्हावी आपले काम उरकून मग आपल्या घरी परत येई.

## व्यवसाय दुपारपर्यंतच करावयाचा असतो

उत्तम कारागिराला कामही भरपूर असे. त्या प्रमाणे कमाईपण उत्तम असे.

पूर्व कालात केशकर्तनाचा धंदा सकाळपासून दुपार पर्यंत करावयाचा नियम होता. या बाबतीत सेनाजी म्हणतात की,
जन्मलो ज्या वंशात । धंदा दोन प्रहर नेमस्थ ।।३।। सेना २, पान ९६

दुपार पर्यंत धंदा करावयाचा हा नेम पाळावा. दुपार नंतर धोकटीला शिवू सुद्धा नये. दुपार नंतर सुद्धा जे धंदा करतील, ते नरकात जातील.

**जे म्हणविती न्हावीयाचे वंशी । तेणे पाळावे स्वधर्माशी ।।१।। येर अवघे बटकीचे । नव्हे न्हावियाचे वंशीचे ।।२।। शास्त्रे नेम नेमियेला । सांडोनि अनाचार केला ।।३।। जन्मलो ज्या वंशात । धंदा दोन प्रहर नेमस्थ ।।४।। सत्व पाळावे स्वधर्माशी । सेना म्हणे आज्ञा ऐशी ।।५।।**
सेना २, पान ९६,

**न्हावियाचे वंशी । जन्म दिला ऋषीकेशी । प्रतिपाळावे धर्माशी । व्यवहाराशी न सांडी ।।१।। ऐका स्वधर्म विचार । धंदा करी दोनप्रहर । सांगितले साचार । पुराणांतरी ऐसे हे ।।२।। करूनिया स्नान । मुखी जपे नारायण । मागुती न जाण । शिवू नये धोकटी ।।३।। ऐसे जे का न मानिती । जातील नरकाप्रती । सफळ पूर्वज बुडविती । शास्त्रसंमती ऐशी हे ।।४।। शिरी पाळावे आज्ञेशी । शरण जावे विठोबाशी । सेना म्हणे त्याशी । ऋषीकेश सांभाळी ।।५।।**
सेना ३, पान ९६.

---

## आई, वडील, सेनांचे पूर्व युगातील जन्म,

सेना महाराजांच्या वडिलांचे नाव देवीदास होते. आईचे नाव प्रेमकुवरबाई असे होते. जन्म बांधवगड येथे झाला. समाधी बांधवगड येथे घेतली.

श्री क्षीरसैन वंश प्रकाश, या पुस्तकात सेनाजींचा जन्म विक्रम संवत १३५७ मध्ये झाल्याचे लिहिले आहे. म्हणजे इ. स. १३०१ मध्ये झाला. त्यावेळी शके १२२३ येते. सेना महाराजांचा जन्म वैशाख वद्य द्वादशी शके १२२३ मध्ये बांधवगड येथे झाला.

| सेना महाराज | शके | इ.सन | विक्रम संवत |
|---|---|---|---|
| जन्म | १२२३ | १३०१ | १३५७ |
| प्रयाण | | | |

सेना महाराजांचे प्रयाण श्रावण वद्य द्वादशी शके ( अज्ञात ) बांधवगड येथे झाले.

सेनाजींच्या जन्मकालाबद्दल एक श्लोक दिसून येतो.

**भीष्मः सेनाभिघो नाम, तुलायां रविवासरे । द्वादशां माधवे कृष्णे, पूर्वाभाद्रपदे च मे । तदीयाराधने सक्तो ब्रह्मयोगे जनिष्यति ।।**

सेनाजी हा भीष्माचार्यांचा अवतार मानला जातो. वैशाख वद्य द्वादशी, रविवार, पूर्वाभाद्रपद नक्षत्र, ब्रह्मयोग, तूळ रास, या दिवशी सेनाजींचा जन्म झाला.

जयहरी या भक्ताने सेनाजींची एक आरती केलेली आहे. या आरतीत त्याने असे म्हटलेले आहे. की देवाच्या महत्वाच्या अवतारात सेनाजीनीही अवतार घेतलेला होता. त्रेतायुगात देव राम अवतार घेऊन आले. त्यावेळी सेनाजीनी गुहक या नावाड्याचा अवतार घेतला. प्रभू रामराय वनवासाला निघाले तेव्हा गुहकाने त्याना आपल्या नावेतून नदी पलीकडे पोहोचवले. तुमच्या बरोबर मीही वनवासाला येतो असे गुहक

## पूर्व युगातील जन्म, रेवा संस्थानचे बांधवगड

म्हणाला. रामरायानी त्याला तुझे चाललेले काम करत रहा. माझे स्मरण सतत ठेव असे सांगितले. गुहकाची रामरायावर अत्यंत निष्ठा होती. रामराय परत येई पर्यंत तो रामानामाचा जप करतच आपली कामे करत होता.

द्वापार युगात देवानी कृष्ण अवतार घेतला. त्या वेळी सेनाजीनी भीष्म अवतार घेतला. भीष्म हा भगवान श्रीकृष्णांचा अत्यंत श्रेष्ठ असा भक्त होता.

**रामअवतारी गुहकरुपे नावाडी जाणा । कृष्णावतारी भीष्म स्वये प्रत्यक्ष श्रीसेना ।।४।।** जयहरी ४ , पान १२७

कलियुगात ते सेना महाराज म्हणून बांधवगडला जन्माला आले. पंजाब, राजपुताना, संयुक्तप्रांत, महाराष्ट्र या भागातील सेनाजींच्या अनुयायानी सेनाजींचे जन्मस्थान आपापल्या सोई प्रमाणे वेगवेगळे दाखवले आहे.

बुंदेल खंडात रेवा संस्थान आहे. त्याची राजधानी बांधवगड हे ठिकाण होते. बांधवगड हा एक मजबूत किल्ला कैमोरच्या डोंगरावर बांधलेला आहे. हे संस्थान जिल्हा प्रयाग (अलाहाबाद) प्रांतात आहे. याच्या उत्तरेला भागिरथी नदी व दक्षिणेला शोणभद्रा नदी वाहाते. ईशान्येला काशी हे क्षेत्र आहे. अलाहाबाद जबलपूर रेल्वे मार्गावर कटनी नावाचे एक जंक्शन आहे. तेथून विलासपूरकडे एक फाटा जातो. त्या फाट्यावर उमरिया नावाचे एक स्टेशन आहे. त्या स्टेशन पासून एक गड दिसतो. त्याला बांधवगड किंवा बांधूगड असे नाव आहे.

सेनामहाराजानी राजस्थानी (मारवाडी), पंजाबी, हिंदी व मराठी या भाषातून अभंगांची रचना केली.

---

## महाराणा रामराजा, देवीदास, प्रेमकुवरबाइ

रेवा संस्थानात वाघेला रजपूत वंशाचे राजे राज्य करत होते. येथे रेवानरेश महाराणा रामराजा यांचे राज्य चालू होते. राजाचे अनेक सेवक होते. त्या पैकी देवीदास हे एक होते. ते सेनाजीचे वडील होते. देवीदास हे वंशपरंपरागत नापीतपणाचा धंदा करत असत. राणांच्या वडीला पासून ते राजदरबारी सेवा करत असत. ते राजाची श्मश्रू करत असत. राजाच्या अंगाला तेल लावून मर्दन करत असत. राजाला स्नान घालत असत. हे काम परंपरे नुसार देविदासकडे सोपवलेले होते. देवीदास वृत्तीने धार्मिक, सदाचार संपन्न व प्रेमळ होते. त्यामुळे राजाची देवीदासवर अतिशय मर्जी होती.

महाराणा रामराजा हे मोठे भगवतभक्त होते. त्यांच्या भक्तिमार्गाचा प्रभाव देविदासावर चांगलाच झाला. राजा देविदासा बरोबर भक्ती, ज्ञान व उपासना याविषयी चर्चा करत असे. यामुळे देविदास व राजा यांचा गाढ सहवास निर्माण झाला. देविदासला नोकरी व ईश्वरविषयक चर्चा या शिवाय दुसरा धंदाच नव्हता. यामुळे देविदासचे घर म्हणजे कृष्णमंदिरच झाले होते.

देविदासच्या स्त्रिचे नाव प्रेमकुवरबाई असे होते. ती सुशील व संसारदक्ष होती. त्यांचा संसार सुखाने चालला होता. संसार करून बरीच वर्षे झाली, पण देवीदासना मूलबाळ झालेले नव्हते. पुढे यथावकाश प्रेमकुवरबाई गर्भवती झाल्या. वैशाख वद्य द्वादशी, रविवार या दिवशी त्याना एक रूपवान शुभचिन्हाचा मुलगा झाला. देविदासाच्या भक्तीचे फळ त्याना मिळाले. त्या मुलाचा दुधा प्रमाणे गौरवर्ण होता. ते पाहून महाराणा रामराजानी त्याचे नाव सेनो असे ठेवले. राणाजीना तो मुलगा अत्यंत आवडला. वेळोवेळी त्या मुला करता दरबारातून नवीन वस्त्रांलकार व वस्तू देविदासकडे येऊ लागल्या.

## रामानंदाचा सेना महाराजावर अनुग्रह

सेनाजी मोठे होऊ लागले. बोलूचालू लागले. त्याना भजन ऐकण्याचा छंद लागला. ऐकलेली भजने ते गाऊ लागले. देविदास व प्रेमकुवरबाई यांच्या आचरणाचे संस्कार न कळत सेनाजींच्या बालमनावर झाले. देविदास कडून सेनानी विविध विषयांचे ज्ञान प्राप्त करून घेतले. देविदासाच्या घरी साधूंची ये जा असे. साधूंच्या सेवेत सेनाजी रममाण होत असत. सेनाची बुद्धी चौकस व चौफेर होती. ते साधूना प्रवासाची हकीगत विचारत असत. प्रवासातील अनुभवांची माहिती विचारून घेत. बालवयातील सेनाजींची ही लक्षणे पाहून त्यांच्या आईवडिलाना धन्यता वाटत असे.

एकदा रामानंदांचे आगमन बांधवगडावर झाले. ते आपले शिष्य देविदासकडे उतरले. त्यांच्या पारमार्थिक चर्चेला चांगला रंग चढू लागला. त्या गप्पा सेना महाराज मन लावून ऐकत होते. आचार्यांची दृष्टी सेनाकडे गेली. आचार्यानी सेना महाराजाना जवळ बोलवले. त्याच्या मस्ताकावर हात ठेवला. सेनाना रामनामाचा मंत्र दिला. सेनाना रामभक्तीचा प्रचार व प्रसार करण्याची आज्ञा दिली.

पुढे सेनांचे लग्न झाले. त्यांचा निष्काम प्रपंच सुरू झाला. देविदासनी आपला व्यवसाय सेनावर सोपवला. देविदास व प्रेमकुवरबाई कालवश झाले.

देविदासाच्या पश्चात आलेली राजसेवेची कामगिरी सेनाजीने आनंदाने पत्करली. तो वडिलोपार्जित धंदा सेना महाराजानी उचलला. रामराजाच्या नंतर वीरसिंह गादीवर बसला. सेनाजी राजाची सेवा नित्य नेमाने करत असत उरलेल्या वेळात देवाची भक्ती करावयाची, हा त्यांचा नियम होता.

सेना महाराजांचा दिनक्रम ठरून गेला होता. ते पहाटे उठत असत. स्नान करून देवपूजेत वेळ घालवत असत. नंतर भजन करत

---

## सेना महाराजांची राजसेवा व निष्काम प्रपंच

असत. नंतर धोकटी घेऊन आपल्या व्यवसायाला बाहेर पडत असत. राजसेवेची वेळ होताच ते राजवाड्यात धोकटी घेऊन जात असत. राजाची सेवा करत असत. वीरसिंह व सेना लहानपणी एकत्र खेळलेले होते. त्यामुळे दोघात प्रेम जिव्हाळा निर्माण झालेला होता. राजा सेनाबरोबर पारमार्थिक चर्चा करत असे.

सेनामहाराज प्रपंच करत असूनही त्यात गुंतले गेले नव्हते. सेना महाराजानी नित्यनेमाने राणाजीची सेवा करण्याचे कर्म आचरलेले होते. राजसेवेत अंतर पडू द्यावयाचे नाही, ही त्यांची रीत होती.

**जो भक्ती सरित पुरी षड्रीची सर्व वाहवी सेना । रुचला मनात बहुतचि तो भगवतभक्त नाहवी सेना ।। धरूनि रूप सेन्याचे, करी घेई धोकटी सहीत । अती प्रेमे झटतसे तो परमात्मा करावयासी दास हित ।।** मोरोपंत आर्या.

सेनाजीनी कामक्रोध, मद मत्सर, दंभ व अहंकार या षडरिपूवर स्वारी केली. त्यानी कामक्रोधाना भक्तीरुप नदीत गटांगळ्या खावयाला लावल्या. असा हा सेनाजी होय.

**तो कामू कोणेचि ठायी । नसे ऐसे केले पाही । की तेचि क्रोधाही । सहजे झाले ।।** ज्ञानेश्वरी १८-१०५९

संत महात्म्यानी तो काम कोणत्याही ठिकाणी नाही, असे केले. म्हणजे या कामाला निःशेष नाहीसे केले. अशी कामाचा स्थिती झाल्यावर, क्रोधाची देखील तीच स्थिती सहज झाली.

**काम नाही काम नाही । झालो पाही रिकामा ।।१।। फावल्या त्या करू चेष्टा । निश्चळ दृष्टा बैसोनि ।।२।।**

तुकोबा ३५८८ व, ८५० जोग, ३९८३ घुले, जोशी,

**कामक्रोध बंदिखाणी । तुका म्हणे दिले दोन्ही । इंद्रियाचे धनी । आम्ही**

---

## रामानंदांची माहिती, सेनांची राजसेवा

**झालो गोसावी ।।४।। गर्जू हरिचे पवाडे । मेळवू वैष्णव बागडे । पाझर रोकडे । काढू पाषाणामध्ये ।।२।।**

तुकोबा १८६३ व, १५८५ जोग, २०९० घुले, जोशी, ३२४ मा, ४५५ प. मा.

**कबीर मोमीन लतीफ मुसलमान । सेना न्हावी जाण विष्णूदास (परमभक्त) ।।६।। कर्म धर्म त्याचा झाला नारायण । त्यांचेनि पावन तिन्ही लोक ।।२।।**

तुकोबा २०७८ व, ३२४१ जोग, २३१२ घुले, जोशी, ११५५ प. मा.

रामानंद हे भगवतभक्त सेनाजींचे गुरू होते. काशी हे रामानंदांचे प्रचार कार्याचे ठिकाण होते. रामदत्त हे त्यांचे पूर्व नाव होते. वयाच्या बाराव्या वर्षी त्यानी सर्व शास्त्राध्ययन केले. राघवानंद हे रामानंदांचे गुरू होते. इ. स. १३०० ते १४११ हा रामानंदांचा काल मानला जातो. रामानंदांचा जन्म माघ वद्य ७ विक्रम संवत १३९६ मध्ये झाला म्हणतात. म्हणजे इ. सन १३४० मध्ये झाला असावा. रामानंदांचे चौदा शिष्य होते म्हणतात. अनंतानंद, सुरसुरानंद, सुखानंद, नरहरीयानंद, योगानंद, रोहिदास, पीपा, तुळशीदास, कबीर, भावानंद, सेनाजी, धना, रमादास व पद्‌मावती हे रामानंदांचे चौदा शिष्य होते. त्यात सेनाजींचे नाव आहे.

सेना महाराज रोज सकाळी राजाच्या घरी जात असत. राजाचे केस कापत असत अथवा दाढी करत असत. केसाला तेल लावून मालीश करत असत. राजाला अंघोळ घालत असत. कार्य आटोपले की घरी परत येत असत. घरी आल्यावर देवाची भक्ती करत असत. जनाबाई म्हणतात की सेनाच्या भक्तीने देव भुलला.

**सेना न्हावी भक्त भला । तेणे देव भुलविला ।।१।। नित्य जपे नामावळी । लावी विठ्ठलाची टाळी ।।२।।**

जनाबाई २७८ आ, ४१४ स, १६८ गोरखपूर, १५१ पारायणप्रत,

-------------------------------------------------------------------------------- - - - -

## सेना राजसेवा विसरले, देव हा दयानिधी आहे

**करिता देवपूजा । नित्यनेम सारिला बोजा । मग आठविले अधोक्षजा । ध्यानस्थ बैसलो ।।१।। दूत आले लवलाही । राये बोलाविले पाही । कोठे आहे मज दावी । उरी न ठेवी याची काही ।।२।।**

सेना ५,

एके दिवशी सकाळी सेना उठले. स्नान केले. देवपूजेला बसले. नित्यनेम झाला. देवाची आठवण झाली. ध्यान लावून बसले. त्याना वेळेचे भान राहिले नाही. राजसेवेची आठवण राहिली नाही.

राजाने बरीच वाट पाहिली. सेना कामाला आले नाहीत. राजाने दूत सेनाकडे पाठवले. सेनाच्या बायकोने पाहिले की सेना देव पूजेत गर्क आहेत. त्याना वेळेचे भान राहिलेले नाही. म्हणून तिने दुताना सांगितले की सेना बाहेर गेलेत. आले की पाठवते. पतीच्या देव पूजेत अडथळा येऊ नये म्हणून सेनाजींच्या बायकोने राजदूताला खोटेच सांगितले होते. दूत परत गेले. वाट पाहून दूत परत आले. सेनाच्या बायकोने परत तसेच सांगितले. असे दोन तीन वेळा झाले.

समाजात संधिसाधू लोक असतात. ते संधीची वाट पहात असतात. सेना महाराजांचे दरबारातील महत्त्व त्याना खटकत असे. त्यानी राजाचे कान भरले. वीरसिंह राजाला राग आला. त्याने सेवकाना सांगितले की सेनाला असेल तसे धरून घेऊन या. मग त्याचा माझ्या समोर शिरच्छेद करा. स्वार्थी दरबारी मंडळीना आनंद झाला. राजाज्ञेचे उल्लंघन हा राजद्रोहाचा भयंकर गुन्हा समजला जाई. राजाला राग आला. राजाने सेनाला कडक शासन करण्याचे ठरवले. राजाने सेना न्हाव्याची मोट बांधून त्याला नदीत टाकून द्यावयाला सांगितले. स्वार्थी मंडळीना वाटले की आता सेना संपला.

**देव दयानिधी भक्तांचा कैवारी । नाममात्रे तारी सर्वालागी ।।१।। तया देवराया गावे हो आवडी । लागे मनी गोडी सर्वकाळ ।।२।।**

---

## सेना राजसेवा विसरले, देव हा दयानिधी आहे

नामदेव ७०५ आ, ६९५ स, २०१८ गोरखपूर, पा,

सेनामहाराज भक्तीत देहभान विसरून मग्न झालेले होते. भगवंतानी विचार केला की आता भक्ताचे रक्षण केले पाहिजे.

**ऐसे अनन्ययोगे । विकले जीवे मने अंगे । तयांचे कायी एक सांगे । जे सर्व मी करी ।।** ज्ञानेश्वरी १२-८२

सर्व जगतावर काळाची अनियंत्रित सत्ता चालत असते. परंतु देव काळाचा पराभव करून भक्ताला आपल्या पदरात घेतो.

**तेषामहं समुद्धर्ता, मृत्युसंसारसागरात् । भवामि न चिरात् पार्थ, मय्यावेशित चेतसाम् ।।** गीता १२-७

माझ्या सगुण स्वरूपाच्या ठिकाणी ज्यानी चित्त ठेवले आहे, अशा त्या भक्ताना मी अल्पकाळात मृत्युरूप संसार सागरातून वर काढतो.

**तेवी मी तया । जैसे असती तैशिया । कळिकाळ नोकोनिया । घेतला पटा ।।** ज्ञानेश्वरी १२-८४

त्या प्रमाणे माझे भक्त जसे असतील, त्या स्थितीत मी त्यांच्यावर प्रेम करतो. कळिकाळाचा पराभव करून मी त्याना आपल्या पदरात घेतो.

**शरणागता वज्र पंजर । अभय दाना तू उदार । सकळ देवा तू अगोचर । होशी अविकार अविनाश ।।२।।**

तुकोबा ४२८ व, ४०८० जोग, ६८३ घुले, ६२७-१ जोशी, १७२ मा, २३७ प. मा.

**किंबहुना धनुर्धरा । जो मातेचिया ये उदरा । तो मातेचा सोयरा । केतुला पा ।।** ज्ञानेश्वरी १२-८३

फार काय सांगावे? अर्जुना जो आईच्या पोटी जन्म घेतो, तो आईचा किती आवडता असतो बरे?

---

## देवानी सेनाचे रूप घेतले व राजाची सेवा करू लागले

**एऱ्हवी तरी माझिया भक्ता । आणि संसाराची चिंता । काय समर्थाची कांता । कोरान्न मागे ।।** ज्ञानेश्वरी १२-८५

**तैसे ते माझे । कलत्र हे जाणिजे । कायिसेनीही न लाजे । तयाचेनि मी ।।** ज्ञानेश्वरी १२-८६

भगवंत म्हणतात की भक्त माझे कुटुंबीय आहेत, असे समजावे. त्यांचे कोणतेही पडलेले काम करण्यात मला कमीपणा वाटत नाही.

**करिता कोणाचेही काज । नाही लाज देवाशी ।।१।। बरे करावे हे काम । धरिले नाम दीनबंधू ।।२।।**

तुकोबा २४५ व, १३७८ जोग, ३६७७ घुले, जोशी,

**रूप पालटोनि गेला । सेना न्हावी विठ्ठल झाला ।।३।। काखे घेऊनि धोकटी । गेला राजियाचे भेटी ।।४।। नित्य जपे नामावळी । लावी विठ्ठलाची टाळी ।।२।।**

जनाबाई २७८ आ, ४१४ स, १६८ गोरखपूर, १५१ पारायणप्रत,

मग भगवंतानी सेना न्हाव्याचे रूप घेतले. काखेत धोकटी घेतली. राजाकडे गेले. राजाकडे सुहास्य मुद्रेने पाहिले. मोठ्या नम्रतेने राजाची माफी मागितली. राजा सेनाच्या लोभसवाण्या रुपाकडे विस्मयतेने पाहू लागला. सेनाला पाहिल्यावर राजाचा राग गेला. राजा मोठ्या आनंदाने श्मश्रू करण्याला बसला.

**आपुले हाती भार घाली । राजियाची सेवा केली ।।५।। विसर तो पडला रामा । काय करू मेघःशामा ।।६।। नित्य जपे नामावळी । लावी विठ्ठलाची टाळी ।।२।।**

जनाबाई २७८ आ, ४१४ स, १६८ गोरखपूर, १५१ पारायणप्रत,

सेनाजीच्या रुपात देव राजाकडे आलेले होते. सेनानी बैठक मांडली. पूर्वी चंपी करण्यापूर्वी व नंतर आरसा दाखवण्याची पद्धत होती. त्या प्रमाणे सेनाजीने राजाच्या हातात आरसा दिला. राजा त्यात

## देवानी सेनाचे रूप घेतले व राजाची सेवा करू लागले

स्वतःचे रूप पाहू लागला. परंतु त्याला त्यात स्वतःचे रूप दिसले नाही. भगवान श्रीकृष्ण परमात्म्याची चतुर्भुज मूर्ती आरशात दिसू लागली. ते पाहून राजाला फार आनंद वाटला.

**राजा अयनियात पाहे । चतुर्भुज उभा राहे ।।७।। नित्य जपे नामावळी । लावी विठ्ठलाची टाळी ।।२।।**

जनाबाई २७८ आ, ४१४ स, १६८ गोरखपूर, १५१ पारायणप्रत,

**करिता नित्य नेम । राये बोलाविले जाण ।।१।। मुख पहाता दर्पणी । आत दिसे चक्रपाणी ।।३।। पांडुरंगे कृपा केली । राया उपरती झाली ।।२।।**

सेना ६, पान ९८.

**रायासन्मुख बैसून । हाती दिधले दर्पण । मुख पाहे अवलोकून । मूर्ती दिसे चतुर्भुज ।।४।। दूत आले लवलाही । राये बोलाविले पाही । कोठे आहे मज दावी । उरी न ठेवी याची काही ।।२।।**

सेना ५,

सेनाजीने राजाच्या डोक्याला हात लावला. राजा सर्व विषय विसरला. त्याची वृत्ती तन्मय झाली.

**विषय तो त्यांचा झाला नारायण । नावडे जन धन मातापिता ।।२।।**

तुकोबा १९९७ व, ७७६ जोग, २२३१ घुले, जोशी, १११९ प. मा.

**मग केले तेलमर्दन । वाटी बिंबला नारायण । विसरला कार्य आठवण । वेधले मन रुपाशी ।।६।।**

सेनाजीने राजाला तेलमर्दन करावयाला घेतले. रत्नखचित वाटीत चमेलीचे तेल घातलेले होते. वाटी खाली ठेवली. सेनाने राजाचे श्मश्रू करावयाला सुरू केले. सेनारुपी देवाने राजाला स्पर्श केला. त्या बरोबर राजाला अद्‌भुत अशी अनुभूती झाली. जड व्याधी पासून आपले शरीर मुक्त होत आहे, असे राजाला जाणवले. मन व बुद्धी या वरील दुष्ट

## देवानी सेनाचे रूप घेतले व राजाची सेवा करू लागले

विचारांचा पगडा नाहीसा झाला. अंतःकरणात दिव्य विचार निर्माण झाले. सेनाजी बद्दल राजाच्या मनात असीम प्रेम भावना निर्माण झाली. वाटीतील सुगंधी तेल सेनारुपी देव राजाला लावू लागले. प्रत्यक्ष ईश्वराचा दिव्य स्पर्श झाल्या बरोबर राजाच्या अंगावरील कोडाचे पांढरे डाग नाहीसे झाले. राजाचे शरीर कांती तेजःपुंज झाली. सेनारूप धारी देवाने राजाच्या हातात आरसा दिला. राजा आरशात पाहू लागला. तो आश्चर्य चकित झाला. चेहऱ्यावरचे कोडाचे पांढरे डाग नाहीसे झालेले होते. तो सेनाजीकडे पाहू लागला. सेना हसत होते.

देवाच्या दर्शना करता अनेक ऋषीमुनी, असंख्य भक्त आपले आयुष्य पणाला लावतात. पण त्याना देवाचे दर्शन होत नाही. देवाचे दर्शन अत्यंत दुर्लभ असते. सेना महाराजासाठी देवाने राजावर कृपा केली.

राजा खाली मान करत असे, तेव्हा त्याला वाटीतील तेलात भगवान श्रीकृष्ण परमात्म्याची चतुर्भुज मूर्ती दिसत असे. वर पाहिले की ते नाहीसे होई. समोर सेना दिसे. राजा खूष झाला.

**कैशी झाली नवल परी । वाटीमाजी दिसे हरी ।।४।। पांडुरंगे कृपा केली । राया उपरती झाली ।।२।।**

सेना ६,

देवाचे ते रूप पाहून राजा अगदी मोहीत झाला. त्याचे देहभान नाहीसे झाले. यामध्ये बराच वेळ गेला. सेनाजी चंपी करत होते. राजा वारंवार आरशात व वाटीत पाहत असे. तेथे त्याला भगवान श्रीकृष्ण परमात्म्याची चतुर्भुज मूर्ती दिसत असे. राजाचे भान हारपले. चंपी थांबवावी असे राजाला वाटेना. बराच वेळ झाला. दुपार होत आली. प्रधानाला काळजी पडली. प्रधानाने राजाला पुढील कार्यक्रमाची आठवण करून दिली. आता लवकर स्नान करून या म्हणून सांगितले. मग

## ध्यानानंतर सेनाजी राजाकडे सेवेसाठी गेले

राजाने सेनाजीला पुरे म्हणून सांगितले. श्मश्रू झाल्यावर राजाने सेनाला सोन्याचे ओंजळभर होन दिले. ते सेनारुपी देवानी धोकटीत ठेवले. काम पूर्ण झाले. सेनाचे रूप घेतलेले भगवंत तेथून निघाले. सेनाच्या घरी आले. धोकटी जागेवर ठेवली. निघून गेले.

सेनाजींची ध्यानसाधना पूर्ण झाली. ते उठले. बायकोने सांगितले की राजाचे दोनतीन निरोप आले होते. सेनाजीनी धोकटी हातात घेतली व ते राजवाड्याकडे निघाले. राजवाड्यातील सेवक सेनाला म्हणाले की महाराज तुम्ही पुन्हा का आलात. सेना म्हणाले की मी आताच येत आहे. यावयाला मला उशीर झाला. ते राजाकडे गेले. राजाने सेनाला पाहिले. राजाचा कंठ दाटून आला. राजा म्हणाला की मी तुला पुन्हा बोलावणारच होतो. आलास बरे झाले. राजा गहिवरून म्हणाला की तू सकाळी माझी जशी चंपी केलीस, तशी आता परत कर. सकाळी वाटीत दाखवलेली मूर्ती पुन्हा दाखव. मला तेल पात्रातील विश्वदर्शन पुन्हा पहावयाचे आहे.

सेनाजी म्हणाले की मी तर आपणाकडे आज आलोच नव्हतो. मी आताच आपल्याकडे येत आहे. मग आपण मघाशी मी आलो होतो हे कसे म्हणता. सेनाजीने अगदी काकुळतीला येऊन राजाला सकाळी आपण आलो नव्हतो असे सांगितले. राजा म्हणाला की मी तुला सकाळी सोन्याच्या मोहरा दिल्या होत्या. तू त्या तुझ्या धोकटीत माझ्या समोर त्या मोहरा ठेवल्या होतेस. तपासून पहा. सेनाने पाहिले तर धोकटीत सोन्याच्या मोहरा होत्या.

हे पाहून सेनाजीला काय प्रकार झाला असावा ते उमगले. हे सर्व प्रभूच्या लीलेचे लाघव आहे, हे त्यानी ओळखले. सेनाजी मनात अत्यंत खजील झाले. माझ्या साठी देवाने कष्ट घेतले. आपल्या भक्तीची

## सेनामुळे राजाला दुर्लभ असलेले देवदर्शन घडले

लाज राखण्यासाठी देव आपल्या रुपाने आले.

**आपुलिया लाजा । धावे भक्ताचिया काजा ।।१।। नाम धरिले दीनानाथ । सत्य करावया व्रत ।।२।।**

तुकोबा २३८३ व, ९९८ जोग, २६२० घुले, जोशी, ६२४ मा, ९१९ प. मा.

सेनाजीच्या डोळ्यातून अश्रू आले. ते राजाला म्हणाले की तुम्ही फार भाग्यवान आहात. तुमचे पूर्व पुण्य फळाला आले. देवाने तुम्हाला दर्शन देऊन तुमची श्मश्रू केली. देवाने आज माझी लाज राखली. राजा तू धन्य आहेस. ज्याच्या दर्शनासाठी लोक अनेक सायास करतात. अनेक साधने करतात. तरीही त्याना देवाचे दर्शन होत नाही. पण देवाने तुम्हाला मात्र आपले रूप दाखवले. तुम्ही धन्य आहात.

**बहुत दिवस होती मज आस । आजी घडले सायास रे । तुका म्हणे होय तुमचेनि पुण्ये । भेटी तया पायाशी रे ।।६।। नाचत जाऊ त्याच्या गावा रे खेळिया । सुख देईल विसावा रे । पुढे गेले ते निधाई झाले । वाणीतील त्यांची सीमा रे ।।२।।**

तुकोबा २३८ व, ३७३८ जोग, २४६ घुले, जोशी, ७८७ प. मा.

सेनाजी मुळेच आपल्याला देवाचे दर्शन झाले. ही जाणीव झाल्यावर राजाला सेनाचे महात्म्य कळाले. त्याच्या मुळे आपल्याला देवदर्शन झाले, याची जाणीव झाली. राजाने सेनाच्या चरणावर आपले मस्तक ठेवले. राजा म्हणाला की आता तुम्हीच माझे गुरू आहात. त्या दिवसा पासून राजाही सेनाजींच्या भजनात भाग घेऊ लागला.

## सेनाजी पंढरीला देवाला व संताना भेटण्यास आले

नंतर सेनाजीने ते होन ब्राह्मणाना दान दिले. भगवंताची अखंड भक्ती करू लागले. ज्ञानोबाराय व नामदेवराय उत्तर भारतात येऊन गेलेले होते. त्यानी तेथे भक्तिमार्ग लोकाना दाखवलेला. त्यांचा आदर्श सेनाजीनी आपल्यापुढे ठेवला. त्या संतांच्या भेटीची इच्छा त्यांच्या मनात उत्पन्न झाली. तसेच सेनाजीना पंढरीची ओढ लागली.

आता सेनाजी प्रपंचा विषयी विरक्त झाले. त्यांची वृत्ती उदासीन झाली. पंढरीचे आकर्षण त्याना साद घालू लागले. राजाकडे त्यानी आपला तीर्थयात्रेला जाण्याचा निर्धार व्यक्त केला. आपल्या कुटुंबाकडे लक्ष ठेवण्यास सांगितले. राजाने त्यांचे मन वळवण्याचा खूप प्रयत्न केला, पण राजाला यश आले नाही. राजा म्हणाला की लवकर परत या. सेनाजी म्हणाले की मृत्यूपूर्वी निश्चित परत येईन. ज्ञानोबारायानी माझ्यावर उपकार केलेला आहे. मला पंढरीचा मार्ग दाखवलेला आहे. मी तिकडे जाणार.

ज्ञानोबाराय व नामदेवराय उत्तर भारतात येऊन गेलेले होते. त्यानी तेथील लोकाना भक्तिमार्ग दाखवलेला होता. लोक संग्रह केलेला होता. भक्ती विषयी समाजात जागृती निर्माण केलेली होती. त्यांच्या शिकवणूकीचा परिणाम सेनाजीवर झाला होता. या संतांचे भागवत धर्माच्या प्रसाराचे अमोल कार्य पाहून ते प्रेरीत झालेले होते. ज्ञानोबारायानी माझ्यावर उपकार केलेला आहे. मला पंढरीचा मार्ग दाखवलेला आहे. मी तिकडे जाणार.

**श्रीज्ञानराजे केला उपकार । मार्ग हा निर्धार दाखविला ।।१।। विटेवरी उभा वैकुंठनायक । आणि पुंडलीक चंद्रभागा ।।२।। अविनाश पंढरी भूमीवरी पेठ । प्रत्यक्ष वैकुंठ दाखविले ।।३।। सेना म्हणे चला जाऊ तया ठाया । पांडुरंग सखया भेटावया ।।४।।**

---

## सेनाजी पंढरीला देवाला व संताना भेटण्यास आले

सेना १३, पान ९१

ज्ञानोबा व नामदेवानी भक्तीचा डांगोरा पिटलेला होता. त्यांचा आदर्श सेनाजीनी आपल्यापुढे ठेवला. त्या संतांच्या भेटीची इच्छा त्यांच्या मनात उत्पन्न झाली. तसेच सेनाजीना पंढरीची ओढ लागली.

**पिटू भक्तीचा डांगोरा । कळिकाळाशी दरारा । तुका म्हणे करा। जयजयकार आनंदे ।।४।। झाडू संतांचे मारग । आडरानी भरले जग । उच्छिष्ठाचा भाग । शेष उरला तो सेवू ।।२।।**

तुकोबा ३८१६ व, २२२ जोग, ३३७२ घुले, जोशी, ४६० प. मा.

**तुम्ही संत मायबाप कृपावंत । काय मी पतित कीर्ती वानू ।।१।। अवतार तुम्हा धराया कारण । उद्धराया जन जडजीव ।।२।। वाढवाया सुख भक्तिभाव धर्म । कुळाचार नाम विठोबाचे ।।३।। तुका म्हणे गुण चंदनाचे अंगी । तैसे तुम्ही जगी संतजन ।।४।।**

तुकोबा १९६६ व, २४५१ जोग, २२०० घुले, ३३०६-३ जोशी, ९७९ मा, ३८४ प. मा.

सेनाजीना महाराष्ट्रातील संत व पंढरीचा विठोबा यांचे आकर्षण वाटले. या सर्वाना भेटण्याकरता ते महाराष्ट्रात आले. पंढरीरायाचे दर्शन घेतले.

**गेलो गेलो पंढरपुरा । ऐकिला नामाचा गजर ।।१।। स्नान केले चंद्रभागा । दर्शन केले पांडुरंगा ।।२।। झाला मनाशी आनंद । गोविंदाचा लागे छंद ।।३।। सेना म्हणे धन्य झालो । शरण संताशी गेलो ।।४।।**

सेना ३,

ज्ञानोबारायादी भावंडानी समाधी घेतलेली होती. त्यांच्या समाधीचे दर्शन घेतले. येथील संताना भेटले. सेनाजीना संताना भेटून धन्यता प्राप्त झाली.

---

## सेनाजी रामानंदाशी निगडीत, पण विठ्ठलभक्ती

असे म्हणतात की सेना महाराजांचे मूळ घराणे महाराष्ट्रातीलच होते. त्यांचे पूर्वज येथून बुंदेलखंडात गेले. व तेथेच स्थाईक झाले. त्यामुळे सेनाना महाराष्ट्रा बद्दल फार प्रेम होते. सेनाना महाराष्ट्रातील संताबद्दल फार आदर व जिव्हाळा होता. सेनांचे गुरू रामानंद गादीवरील होते, तरी सुद्धा सेनाजी ज्ञानोबारायाना गुरूस्थानी मानत होते. रामानंदाचा देव राम हा होता. परंतु सेनाना पांडुरंग प्रिय होता. म्हणून पुढे ते पंढरीला आले. पांडुरंगाच्या ओढीने ते पुढे पंढरीला आले. सेनाजीनी पांडुरंगाशी आपले नाते जोडले. ज्ञानदेव, नामदेव याना आपले आप्तइष्ट मानले. आपल्या अभंग रचनेत ज्ञानदेव, नामदेव यांचा गौरव केला.

सेनाजींचे गुरू घराणे हे रामानंद मठाशी निगडीत होते. रामानंद हे रामभक्तीचा पुरस्कार करणारे होते. पण सेनाजीवर महाराष्ट्रीय संतांचा जास्त प्रभाव पडला होता. त्यामुळे ते विठ्ठलभक्त बनले. जास्तीतजास्त मराठी संत मेळाव्यात ते रमले. ते इतके रमले की ते महाराष्ट्रीयनच आहेत, असे अनेकाना वाटते.

## सेनाजीनी बांधवगडला समाधी घेतली, निर्याणाचे अभंग

महाराष्ट्रातून सेनाजी परत बांधवगडला गेले. तेथेच भक्ती करत राहीले. पुढे सेनाजीनी श्रावण वद्य द्वादशीला दुपारी समाधी घेतली. समाधी बांधवगड येथे घेतली.

सेनांचा निर्वाणीचा उपदेश व निर्याण प्रसंगी म्हणावयाचे अभंग

**माझे झाले स्वहित । तुम्हा सांगतो निश्चित ।।१।। करा हरिचे चिंतन । गावे उत्तम हे गुण ।।२।। प्रभू कृपेविण । नाही अन्य साधन ।।३।। श्रावण वद्य द्वादशी । सेना समाप्त त्या दिवशी ।।४।।**

सेना २२, पान ८८

**स्वहिताकारणे सांगतसे तुज । अंतरीचे गुज होते काही ।।१।। करा हरी भजन तराल भवसागर । उतरील पैलपार पांडुरंग ।।२।। कृपा नारायणे केली मजवरी । तुम्हा लागी हरी विसंबेना ।।३।। सेना सांगुनिया जातो वैकुंठाशी । तिथी ते द्वादशी श्रावण मास ।।४।।**

सेना २३, पान ८८

सेनाजींच्या निर्याणाची आरती

**जय जयाजी महाराजा श्रीसद्गुरू सेना । आरती करितो भावे कर जोडूनि नमना ।।१।। असता वैकुंठाशी स्वये सांगती ऋषीकेशी । जन्मूनि नाभिकवंशी उद्धरी सकळ जना ।।२।। रामानंदाच्या प्रसादे पूजा करी नित्य धरूनिया नेमा । तयाच्यासाठी स्वरूप धरी स्वये श्रीपंढरीराणा ।।३।। रामअवतारी गुहकरुपे नावाडी जाणा । कृष्णावतारी भीष्म स्वये प्रत्यक्ष श्रीसेना ।।४।। श्रावण वद्य द्वादशीशी भजन कीर्तना । करूनि माध्यानीशी गेले वैकुंठभुवना ।।५।। सद्गुरूसेवक जयहरी अनन्यभावे लोटांगण । घाली प्रेमे आरती करितसे नमना ।।६।।**

---

## सेनाजींच्या निर्याण प्रसंगीची आरती

जयहरी ४ , पान १२७

**आरती ही सेना । शुद्ध करूनि मना । ओवाळू आरती । मज उद्धरी दीना ।।१।। भक्ताचे संकटी । धावलासे जगजेठी । सेना रूप धरियेले । पतित पावना ।।२।। लोह परिसाचे संगती । सुवर्ण होती । दावी संत महिमा । विश्वंभरचरणा ।।३।।**

विश्वंभर १, पान १२६

**जय जयाजी विष्णूदासा । भक्तिभाव तुझा कैसा ।।१।। प्रत्यक्ष पूर्णब्रह्म दावी । राजियाशी आरसा ।।२।। जन्मोनि न्हावियाचे वंशी । भक्ती केली त्या भोळी ।।३।। दावियेले कौतुक । देव पूजेचिया वेळी ।।४।। श्रावण वद्य द्वादशी । सेना बैसे समाधीशी ।।५।। निळा शरण प्रेमभावे । विष्णूदास सेनियाशी ।।६।।**

निळोबा -

## सेनाजींचे काही निवडक अभंग

पूर्व कालात केशकर्तनाचा धंदा सकाळपासून दुपार पर्यंत करावयाचा नियम होता. या बाबतीत सेनाजी म्हणतात की,

**जन्मलो ज्या वंशात । धंदा दोन प्रहर नेमस्थ ।।३।।** सेना २, पान ९६

दुपार पर्यंत धंदा करावयाचा हा नेम पाळावा. दुपार नंतर धोकटीला शिवू सुद्धा नये. दुपार नंतर सुद्धा जे धंदा करतील, ते नरकात जातील.

**जे म्हणविती न्हावीयाचे वंशी । तेणे पाळावे स्वधर्माशी ।।१।। येर अवघे बटकीचे । नव्हे न्हावियाचे वंशीचे ।।२।। शास्त्रे नेम नेमियेला । सांडोनि अनाचार केला ।।३।। जन्मलो ज्या वंशात । धंदा दोन प्रहर नेमस्थ ।।४।। सत्व पाळावे स्वधर्माशी । सेना म्हणे आज्ञा ऐशी ।।५।।**
सेना २, पान ९६,

**न्हावियाचे वंशी । जन्म दिला ऋषीकेशी । प्रतिपाळावे धर्माशी । व्यवहाराशी न सांडी ।।१।। ऐका स्वधर्म विचार । धंदा करी दोनप्रहर । सांगितले साचार । पुराणांतरी ऐसे हे ।।२।। करूनिया स्नान । मुखी जपे नारायण । मागुती न जाण । शिवू नये धोकटी ।।३।। ऐसे जे का न मानिती । जातील नरकाप्रती । सफळ पूर्वज बुडविती । शास्त्रसंमती ऐशी हे ।।४।। शिरी पाळावे आज्ञेशी । शरण जावे विठोबाशी । सेना म्हणे त्याशी । ऋषीकेश सांभाळी ।।५।।**
सेना ३, पान ९६.

धंद्यानुरुप अभंग

**आम्ही वारीक वारीक । करू हजामत बारीक ।।१।। विवेक दर्पण आयना दाऊ । वैराग्य चिमटा हालवू ।।२।। उदक शांती डोई घोळू । अहंकाराची शेंडी पिळू ।।३।। भावार्थाच्या बगला झाडू । कामक्रोध**

## सेनाजींचे काही निवडक अभंग

**नखे काढू ।।४।। चौ वर्णा देऊनि हात । सेना राहिला निवांत ।।५।।**
सेना १,

धंद्यानुरुप जी हजामत करू, ती अशी आहे. आम्ही हजमात बारीक करू. आमच्या जवळ जो आरसा आहे, तो विवेकाचा आहे. म्हणजे हजामत करताना पदोपदी विवेक दाखवू. आणि वैराग्याचा चिमटा हालवू. डोक्यावर जे पाणी घालू, ते शांतीचे उदक घालणार आहोत. हजामत केल्यावर डोक्यावर शेंडी ठेऊ. ही शेंडी अहंकाररुपी असेल व तिला पीळ देऊ. नंतर बगलेतले केस काढतात. सेनाजी म्हणतात की या बगला भावार्थाच्या असतील. हातापाया वरील नखे काढतो. ही नखे म्हणजे कामक्रोध होय. आम्ही कामक्रोधरुपी नखे काढू. अशा प्रकारे आम्ही चारी वर्णाची हजामत करतो.

**म्हणवितो दास । तरी सांभाळी ब्रिदास ।।१।। शुद्ध नाही भाव । तू जाणशी पंढरीराव ।।२।। केलेसे जतन । धोकटी आरशाची जाण ।।३।। करितो व्यवसाय । माझ्या जातीचा स्वभाव ।।४।। सेना करितो विनवणी । हात जोडोनिया दोन्ही ।।५।।**
सेना ४, पान ९६.

सेनाजीनी स्वतः वर्णन केलेले त्यांचे चरित्र

**करिता देवपूजा । नित्यनेम सारिला बोजा । मग आठविले अधोक्षजा । ध्यानस्थ बैसलो ।।१।। दूत आले लवलाही । रायो बोलाविले पाही । कोठे आहे मज दावी । उरी न ठेवी याची काही ।।२।। जाणूनि संकट श्रीहरी । धोकटी घेतली खांद्यावरी । त्वरे आला राजदरबारी । देखूनि हरी क्रोध निमाला ।।३।। रायासन्मुख बैसून । हाती दिधले दर्पण । मुख पाहे विलोकून । मूर्ती दिसे चतुर्भुज ।।४।। हात लाविला मस्तका**

-------------------------------------------------------------------------------- - - - -

## सेनाजींचे काही निवडक अभंग

**। वृत्ती हारपली देखा । राव म्हणे प्राणसखा । नित्य भेटे मजलागी ।।५।। मग केले तेलमर्दन । वाटी बिंबला नारायण । विसरला कार्य आठवण । वेधले मन रुपाशी ।।६।। भोवती पाहे विलोकून । अवघा बिंबला नारायण । तटस्थ पाहती सभाजन । नाही भान रायाशी ।।७।। राव म्हणे हरिशी । तुम्ही रहावे मजपाशी । तुजविण न गमे दिवसनिशी । हरी म्हणे भाकेशी न गुंते मी ।।८।। मग प्रधाने काय केले । राया स्नानाशी पाठविले । राये होन दिधले । हरिने धोकटीत ठेविले ।।९।। शुद्ध नाही याती । नाही केली हरिभक्ती । शिणविला कमळापती । नाही विरक्ती बाणली अंगी ।।१०।। नाही अपराधा गणित । देखोनि होन ब्राह्मणा देत । देवास घाली संकटात । आण वाहत विठोबाची ।।११।। सेना म्हणे ऋषीकेशी । मजकारणे शिणलाशी । म्हणूनि लागतो चरणाशी । संसाराशी त्यागिले ।।१२।।**

सेना ५ पान ९७.

**करिता नित्यनेम । राये बोलाविले जाण ।।१।। पांडुरंगे कृपा केली । राया उपरती झाली ।।२।। मुख पहाता दर्पणी । आत दिसे चक्रपाणी ।।३।। कैशी झाली नवल परी । वाटीमाजी दिसे हरी ।।४।। रखुमादेविवर । सेना म्हणे मी पामर ।।५।।**

सेना ६, पान ९८.

**श्रीज्ञानराजे केला उपकार । मार्ग हा निर्धार दाखविला ।।१।। विटेवरी उभा वैकुंठनायक । आणि पुंडलीक चंद्रभागा ।।२।।अ विनाश पंढरी भूमीवरी पेठ । प्रत्यक्ष वैकुंठ दाखविले ।।३।।से ना म्हणे चला जाऊ तया ठाया । पांडुरंग सखया भेटावया ।।४।।**

सेना १३, पान ९१

---

संग्राहक - ह. भ. प. नंदकुमार विश्वंभर बोंगाळे, श्रीगुरू बाबासाहेब आजरेकर फडावरील वारकरी.

## सेनाजींचे काही निवडक अभंग

**ज्ञानदेव गुरू ज्ञानदेव तारू । उतरील पैलपारू ज्ञानदेव ।।१।। ज्ञानदेव माता ज्ञानदेव पिता । तोडील भवव्यथा ज्ञानदेव ।।२।। ज्ञानदेव माझे सोयरे धायरे । जीवलग निर्धारी ज्ञानदेव ।।३।। सेना म्हणे माझा ज्ञानदेव निधान । दाविली निजखूण ज्ञानदेवे ।।४।।**

**जाता पंढरीशी सुख वाटे जीवा । आनंदे केशवा भेटताचि ।।१।। या सुखाची उपमा नाही त्रिभूवनी । पाहिली शोधोनि अवघी तीर्थे ।।२।। ऐसा नामघोष ऐसे पताकांचे भार । ऐसे वैष्णव डिंगर दावा कोठे ।।३।। ऐशी चंद्रभागा ऐसा पुंडलीक । ऐसा वेणू नादी काला दावा ।।४।। ऐसा विटेवरी उभा कटेवरी कर । ऐसे पहाता निर्धार नाही कोठे ।।५।। सेना म्हणे खूण सांगितली संती । या परी विश्रांती नाही जीवा ।।६।।**

सेना

पाळणा

**बाळा जो जो रे । मधुसुदना । झोप तुला येईना ।।१।। पाळणा हालविते, गुण गाते, हरिनाम भजना ।।२।। बसलास उठोनि, हाटोनि, करितोस गर्जना ।।३।। लाविते तुज नादी, बहुछंदी, म्हणे भक्त सेना ।।४।।**

सेना ३९, पान १०७

## जनाबाईने वर्णन केलेले सेनाजींचे चरित्र

सेना महाराजाचे जनाबाईने वर्णन केलेले चरित्र

**सेना न्हावी भक्त भला । तेणे देव भुलविला ।।१।। नित्य जपे नामावळी । लावी विठ्ठलाची टाळी ।।२।। रूप पालटोनी गेला । सेना न्हावी विठ्ठल झाला ।।३।। काखे घेऊनि धोकटी । गेला राजियाचे भेटी ।।४।। आपुले हाते भार घाली । राजियाची सेवा केली ।।५।। विसर तो पडला रामा । काय करू मेघःशामा ।।६।। राजा अयनियात पाहे । चतुर्भुज उभा राहे ।।७।। दूत धाडोनिया नेला । राजियाने बोलाविला ।।८।। राजा बोले प्रीतीकर । रात्री सेवा केली फार ।।९।। राजसदना प्रती न्यावे । भीतरीच घेऊन जावे ।।१०।। आता बरा विचार नाही । सेना म्हणे करू काई ।।११।। सेना न्हावी गौरविला । राजियाने मान दिला ।।१२।। कितीकांचा शीण गेला । जनी म्हणे न्हावी झाला ।।१३।।**

जनाबाई २७८ आ, ४१४ स, १६८ गोरखपूर, १९५ पारायण प्रत

तुकोबारायानी सेनाचा केलेला उल्लेख

**कबीर मोमीन लतीफ मुसलमान । सेना न्हावी जाण विष्णूदास (परमभक्त) ।।६।। कर्म धर्म त्याचा झाला नारायण । त्यांचेनि पावन तिन्ही लोक ।।२।।**

तुकोबा २०७८ व, ३२४१ जोग, २३१२ घुले, जोशी, ११५५ प. मा.

---